निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
२७ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १६ वे अंक: २१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### वेरुळच्या ऐतिहासिक भूमीवर भूमाफियांचा दरोडा

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद / विशेष प्रतिनिधी/** जगप्रसिद्ध लेणी आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वेरूळ नगरीत सध्या भूमाफियांच्या 'अर्थपूर्ण' हालचालींनी खळबळ माजली आहे. चक्क शासकीय जमिनीची बेकायदा खरेदी-विक्री करून नियमांची पायमल्ली केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, यात महसूल प्रशासनातील काही बड्या माशांचे हात ओले झाल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे वेरूळ येथील गट क्र. ६९३ (सर्वे क्र. ३०१) ही जमीन शासकीय दप्तरी नोंद आहे. ही जागा समाधी आणि मल्हार स्वामींच्या नावे असलेली अत्यंत पवित्र जमीन मानली जाते. मात्र, या जमिनीवर सध्या तुकडेबंदी कायद्याचे धिंडवडे उडवले जात आहेत. कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी न घेता या जमिनीचे तुकडे पाडून तिची विक्री केली जात आहे.

स्टॅम्प वेंडरच निघाला मुख्य सूत्रधार!

या प्रकरणातील सर्वात खळबळजनक बाब म्हणजे, कायद्याची जाण असलेल्या एका स्टॅम्प वेंडरनेच महसूल विभागातील काही 'विभागीय' अधिकाऱ्यांना हाताशी धरून स्वतःच्या नावे ६ गुंठे जमिनीची खरेदी केली आहे. ज्यांनी कायद्याचे रक्षण करायचे, त्यांनीच भक्षकाची भूमिका घेतल्याने संताप व्यक्त केला जात आहे. मूळ सातबाऱ्यावरील 'शासकीय' आणि 'समाधी' ही नोंद गायब होऊन खासगी नाव चढलेच कसे? असा संतप्त सवाल तक्रारदार कृष्णा चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.

**प्रशासकीय वरदहस्ताने सरकारी जमिनीचा लिलाव?**

प्रशासकीय डोळेझाक की अभय?

वेरूळ शिवारात उघडपणे सुरू असलेल्या या गैरप्रकाराबाबत तहसीलदारांकडे तक्रारीचा पाढा वाचण्यात आला आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. शासकीय जमिनीचा सातबारा बदलण्याइतपत हिंमत भूमाफियांमध्ये येतेच कशी? यामागे महसूल विभागातील कोणत्या अदृश्य शक्तीचा हात आहे? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

जर वेळीच या खरेदी-विक्री व्यवहारांना स्थगिती देऊन दोषींवर गुन्हे दाखल केले नाहीत, तर भविष्यात या ऐतिहासिक भूमीवर सिमेंटचे जंगल उभे राहील आणि आपण आपला वारसा कायमचा गमावून बसू.

**- कृष्णा चव्हाण**

-या प्रकरणातील '**अर्थपूर्ण**' व्यवहारांची तातडीने उच्चस्तरीय चौकशी व्हावी.

-संबंधित स्टॅम्प वेंडर आणि त्याला साथ देणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

-जमिनीच्या सातबाऱ्यावरील फेरफार रद्द करून मूळ 'शासकीय' स्थिती पुनर्संचयित करावी.

प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास येणाऱ्या काळात हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. आता चेंडू जिल्हाधिकारी आणि महसूल प्रशासनाच्या कोर्टात आहे.

# सुजलाम सुफलाम सावनेरच्या विकासाच्या दिशेने दमदार सुरुवात - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर प्रतिनिधी/** सावनेरच्या मुख्य रस्त्याचे सौंदर्यीकरण व मौनीबाबा आश्रमाचे भूमिपूजन आज झाले. खत आणि कोल






गॅसिफिकेशन असे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार आहेत यातून ४० हजारावर रोजगार निर्मिती होणार आहे. या सर्व प्रकल्पांमधून सुजलाम-सुफलाम सावनेर होण्याच्या दिशेने सुरुवात झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

जगात युद्धाची परिस्थिती असताना भारत विश्वशांतीच्या दिशेने विचार करतो आणि विश्वशांतीसाठी विश्व महाआरतीचे सावनेर मध्ये झालेले आयोजन भूषणावह असल्याच्या भावना व्यक्त करून महाआरतीच्या गिनिज बुक ऑफ रेकॉर्डसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

श्री रामनवमीच्या पवित्र पर्वावर सावनेर नगरपरिषद मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती विश्वविक्रमी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच विकास कामांचे ऑनलाईन भूमिपूजनही त्यांचा हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ड आशिष जयस्वाल,आमदार डॉ. आशिष देशमुख ,माजी मंत्री रणजित देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रभु राम हे आपले आदर्श आहेत. समाजात कोणी लहान मोठे नसून सर्व समान असल्याची शिकवण देऊन त्यांनी युगधर्म मांडला. त्याच प्रभु रामांच्या जन्मदिनी रामनवमीला सावनेरचा मुख्य रस्ता सौंदर्यीकरण प्रकल्प आणि रघवी समाजाचे थोर संत मौनीबाबा यांच्या आश्रमाचे बांधकाम व सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन झाले.

सावनेर मतदार संघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी या भागात कोल गॅसीफिकेशन प्रकल्प आणि खत प्रकल्पसाठी केंद्र व राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला.

येत्या काळात हे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार असून याद्वारे जवळपास ४० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या सर्व कामांद्वारे या भागाच्या विकासाला चालना मिळेल व हा भाग सुजलाम- सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय रस्ते निधीच्या २६ कोटी रुपयातून सावनेर मुख्य रस्ता सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे तर ५ कोटी खर्चातून मौनीबाबा आश्रम उभारणी व सौंदर्यीकरण होणार आहे.

तत्पूर्वी ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री तथा पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल यांच्यासह ४९११ भक्तांनी गणपतीची महाआरती केली. याच कार्यक्रमात गिनीज बुक ऑफ रेकॉर्डच्या भारतातील अधिकाऱ्याने या महाआरतीचा हा गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. आमदार डॉ आशिष देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**मुंबई** / महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय फिलेरियासिस निर्मूलन शक्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील या आजाराचा प्रादुर्भाव हा नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत.

सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया. ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

# अग्निशमन दलाच्या अभावामुळे ग्रामस्थांत संताप

### लासूर स्टेशनला भीषण आग: 'पूजा ऑटो पार्टस' जळून खाक, २३ लाखांचे नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)**गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील व्यापारी पेठेत २५ मार्च २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत संतोष काळे यांच्या मालकीच्या 'पूजा ऑटो पार्टस' या दुकानातील अंदाजे २३ लाख ५० हजार रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे. प्रशासकीय दिरंगाई आणि अग्निशमन दलाची कमतरता पुन्हा एकदा या घटनेमुळे चव्हाट्यावर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटेच्या शांततेत अचानक 'पूजा ऑटो पार्टस' गॅरेजमधून आगीचे लोळ उठू लागले. शॉर्टसर्किटमुळे लागलेली ही आग इतकी भीषण होती की, बघता बघता तिने संपूर्ण दुकानाला वेढले. दुकानातील टायर, इंजिन ऑईल, स्पेअर पार्टस आणि इलेक्ट्रिक साहित्य यांनी पेट घेतल्यामुळे आगीने रौद्र रूप धारण केले होते.

मुस्लिम बांधवांनी वाचवली महादेवाची मूर्ती; व्हिडिओ व्हायरल

या संकटकाळात माणुसकीचे दर्शन घडवणारी एक घटना समोर आली आहे. आग लागलेली असताना परिसरातील नागरिक मदतीसाठी धावून आले. यामध्ये विशेष म्हणजे स्थानिक मुस्लिम बांधवांनी जीवाची पर्वा न करता आगीतून महादेवाची मूर्ती सुरक्षित बाहेर काढली. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, जातीय सलोख्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. नागरिकांनी मिळेल त्या साधनाने आणि पाण्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. सुमारे दीड तासाच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आली, मात्र तोपर्यंत दुकानातील साहित्याची राखरांगोळी झाली होती.

**प्रशासनाविरुद्ध संतापाची लाट**

**कधी मिळणार हक्काची अग्निशमन गाडी?**

लासूर स्टेशन हे तालुक्यातील एक मोठे व्यापारी केंद्र आहे. मात्र, येथे हक्काची अग्निशमन गाडी नसल्याने वारंवार नुकसान सोसावे लागत आहे. काही दिवसांपूर्वीच समृद्धी महामार्गाजवळ डिझेल टँकरला लागलेल्या आगीतही मोठी हानी झाली होती. एखादी दुर्घटना घडल्यास छत्रपती संभाजीनगर येथून बंब येईपर्यंत सर्वकाही जळून खाक झालेले असते. ग्रामस्थांनी आणि व्यापाऱ्यांनी वारंवार मागणी करूनही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे.




**व्यापाऱ्यांचे कंबरडे मोडले**

संतोष काळे यांच्या दुकानातील २३ लाख ५० हजारांचे नुकसान झाल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने, नागरिकांच्या तत्परतेमुळे आग शेजारील दुकानांपर्यंत पोहोचली नाही, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. आता तरी ग्रामपंचायत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी जागे होऊन लासूर स्टेशनसाठी कायमस्वरूपी अग्निशमन गाडी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# रेल्वे चोरांचा कर्दनकाळ!

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड (विभागीय प्रतिनिधी)** रेल्वे प्रवाशांच्या जीवावर आणि मालावर डल्ला मारणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने आता युद्ध पुकारले आहे. 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' मोहिमेअंतर्गत रेल्वे सुरक्षा बलाने (ठझक्र) सलग दोन मोठ्या कारवाया करत दोन अट्टल चोरट्यांना रंगेहात पकडून तुरुंगाची हवा दाखवली आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण झाली असून गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

**'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत ठझक्रकडून मोठी कारवाई; परभणी आणि संभाजीनगरमध्ये दोन चोरट्यांना बेड्या**

**पहिली कारवाई: परभणी स्थानकावर मध्यप्रदेशचा चोरटा गजाआड**



दिनांक २५ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:३० च्या सुमारास परभणी रेल्वे स्थानकावर आरपीएफचे पथक प्रवाशांच्या सुरक्षेसाठी गस्त घालत होते. प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरील ठचड कार्यालयाजवळ एक संशयास्पद तरुण प्रवाशांच्या सामानावर नजर ठेवून असल्याचे सहाय्यक उपनिरीक्षक अमोल वावळे यांच्या निदर्शनास आले. तो प्रवाशांचे सामान चोरण्याच्या तयारीत असतानाच वावळे यांनी चित्त्याच्या चपळाईने झडप घालून त्याला जागीच पकडले.

तपासात या आरोपीचे नाव अजय (रा. बुरहानपूर, मध्यप्रदेश) असल्याचे निष्पन्न झाले. आरपीएफने त्याला तातडीने ताब्यात घेऊन परभणी जीआरपीच्या स्वाधीन केले. त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ११० व ११७ अन्वये गुन्हा (रजि. ६७/२०२६) दाखल करण्यात आला आहे.

**दुसरी कारवाई: चालत्या ट्रेनमध्ये मोबाईल चोरटा पकडला!**

दुसरी धडक कारवाई छत्रपती संभाजीनगर ते लासूर दरम्यान धावणाऱ्या ट्रेन क्रमांक १७२०८ एक्सप्रेसमध्ये करण्यात आली. आरपीएफचे हनुमान मीणा, कॉन्स्टेबल आर. के. मीणा आणि के. के. मीणा हे रेल्वे डब्यात गस्त घालत असताना ड-०८ डब्याच्या दरवाजाजवळ एक तरुण संशयास्पदरीत्या उभा असल्याचे दिसले.

सुरक्षा दलाने त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अधिक झडती घेतली असता त्याच्याकडे २७,९९९ रुपये किमतीचा महागडा विवो (Vivo) मोबाईल सापडला.



सखोल चौकशीत त्याने हा मोबाईल एका अज्ञात प्रवाशाकडून चोरल्याची कबुली दिली. आरोपी आकाश (वय २७, रा. अहमदनगर) याला अटक करण्यात आली असून, छत्रपती संभाजीनगर जीआरपीमध्ये भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम ३०५(क) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड विभागाचे आरपीएफ जवान रेल्वेतील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी अहोरात्र सतर्क आहेत. प्रवाशांनी आपल्या सामानाची काळजी घ्यावी आणि कोणतीही संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल दिसल्यास तात्काळ आरपीएफ हेल्पलाईन क्रमांक १८२ वर संपर्क साधावा, असे आवाहन जनसंपर्क विभाग, नांदेडतर्फे करण्यात आले आहे.

# प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून मुंबई दिल्लीसह देशातील सर्वच महानगरे आणि मोठी शहरे प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई – दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम – विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

# सम्राट अशोक : धर्म, न्याय आणि मानवतेचा दीपस्तंभ

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि शासकांनी आपापल्या कार्याची अमिट छाप सोडली आहे; परंतु ज्यांनी केवळ राज्यकारभारात यश मिळवले नाही, तर मानवी मूल्यांचा, नैतिकतेचा आणि शांततेचा मार्ग स्वीकारून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श निर्माण केला, अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये सम्राट अशोक यांचे स्थान सर्वोच्च मानले जाते. सम्राट अशोक यांची जयंती ही केवळ एका राजाची आठवण नसून, ती मानवी जीवनातील परिवर्तन, आत्मपरीक्षण आणि धर्माधिष्ठित शासनव्यवस्थेची प्रेरणा देणारी एक महान घटना आहे.

सम्राट अशोक हे मौर्य साम्राज्याचे तिसरे सम्राट होते. त्यांचा जन्म इ.स.पूर्व ३०४ च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील सम्राट बिंदुसार आणि आजोबा चंद्रगुप्त मौर्य होते. चंद्रगुप्त मौर्य यांनी स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्याचा विस्तार आणि सुदृढीकरण करण्याचे महान कार्य अशोकांनी केले. बालपणापासूनच अशोक हे बुद्धिमान, पराक्रमी आणि धाडसी होते. त्यांना युद्धकलेत प्रावीण्य होते आणि राज्यकारभाराची उत्तम समज होती. त्यामुळेच त्यांच्या वडिलांनी त्यांना विविध प्रांतांचे राज्यपाल म्हणून नेमले होते. तक्षशिला आणि उज्जैनसारख्या महत्त्वाच्या प्रांतांचे प्रशासन त्यांनी कुशलतेने सांभाळले.

राजसिंहासनावर आरूढ झाल्यानंतर सम्राट अशोकांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अनेक मोहिमा केल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची आणि ऐतिहासिकदृष्ट्या निर्णायक ठरलेली मोहिम म्हणजे कलिंग युद्ध. इ.स.पूर्व २६१ मध्ये झालेल्या या युद्धात अशोकांनी विजय मिळवला; परंतु या विजयाची किंमत अत्यंत भीषण होती. हजारो सैनिक आणि निरपराध नागरिक मारले गेले, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, आणि संपूर्ण प्रदेशात हाहाकार माजला. या युद्धानंतर अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. रणांगणावर पडलेल्या मृतदेहांचे दृश्य, विधवा झालेल्या स्त्रियांचा आक्रोश आणि अनाथ मुलांचे दुःख पाहून अशोकांच्या अंतःकरणात प्रचंड वेदना निर्माण झाली.

याच क्षणापासून अशोकांच्या जीवनात एक महान परिवर्तन घडले. त्यांनी युद्ध आणि हिंसेचा मार्ग सोडून धर्म, अहिंसा आणि करुणेचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि 'धम्म' या संकल्पनेचा प्रसार सुरू केला. अशोकांचा 'धम्म' हा केवळ धार्मिक आचार-विचारांपुरता मर्यादित नव्हता, तर तो नैतिक जीवनपद्धतीचा मार्ग होता. सत्य, अहिंसा, करुणा, दया, सहिष्णुता, प्रामाणिकपणा आणि सर्व जीवांप्रती आदर या मूल्यांचा त्यांनी प्रचार केला.सम्राट अशोकांनी आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी आपल्या राज्यभर शिलालेख आणि स्तंभ उभारले, ज्यांवर धम्माचे उपदेश कोरलेले होते. हे शिलालेख आजही भारताच्या विविध भागांत आढळतात आणि अशोकांच्या विचारांचा जिवंत पुरावा म्हणून उभे आहेत. त्यांनी 'धम्म महामात्र' या अधिकाऱ्यांची नेमणूक केली, ज्यांचे काम लोकांमध्ये नैतिकता आणि सदाचार यांचा प्रसार करणे होते. अशोकांनी आपल्या प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांनी रस्त्यांच्या कडेला झाडे लावली, विहिरी आणि धर्मशाळा बांधल्या, प्राण्यांसाठी आणि माणसांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली.सम्राट अशोकांची शासनपद्धती अत्यंत प्रगत आणि लोकाभिमुख होती. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आदर्श ठेवला आणि सर्व धर्मांना समान आदर दिला. त्यांनी कोणत्याही एका धर्माला प्राधान्य न देता सर्वांच्या श्रद्धांचा सन्मान केला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार हा केवळ सत्ता चालवण्याचा मार्ग नव्हता, तर तो जनतेच्या कल्याणासाठी असलेली एक जबाबदारी होती. त्यांनी न्यायव्यवस्था सुधारली आणि लोकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी विशेष यंत्रणा निर्माण केली.

अशोकांनी बौद्ध धर्माचा प्रसार केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही, तर त्यांनी त्याचा प्रसार जगभर केला. त्यांनी आपल्या पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले, जिथे त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार केला. तसेच त्यांनी इतर देशांमध्येही धम्मदूत पाठवले. यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार आशिया खंडातील अनेक देशांमध्ये झाला. अशोकांच्या या प्रयत्नांमुळे भारताला 'शांततेचा संदेश देणारा देश' म्हणून ओळख मिळाली.

सम्राट अशोकांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजही जाणवतो. भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र हे त्यांच्या विचारांचे प्रतीक आहे. हे चक्र सत्य, न्याय आणि प्रगतीचा मार्ग दर्शवते. तसेच भारताच्या राज्यचिन्हात असलेले सिंहस्तंभ हेही अशोकांच्या काळातील वारसा आहे. यावरून अशोकांच्या विचारांचा आणि कार्याचा भारतीय राष्ट्रजीवनावर किती खोल प्रभाव आहे, हे स्पष्ट होते.

आजच्या काळात, जेव्हा जगात हिंसा, द्वेष आणि असहिष्णुता वाढत आहे, तेव्हा सम्राट अशोकांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या जीवनातून आपल्याला हे शिकायला मिळते की, खरा विजय हा शस्त्रांच्या जोरावर मिळत नाही, तर तो मन जिंकण्याने मिळतो. अशोकांनी दाखवून दिले की, एक शासक केवळ पराक्रमी असणे पुरेसे नाही, तर तो संवेदनशील आणि नैतिकदृष्ट्या सजग असणेही आवश्यक आहे.

सम्राट अशोकांची जयंती ही केवळ ऐतिहासिक स्मरणरंजनाचा दिवस नसून, ती आत्मपरीक्षणाची आणि मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याची संधी आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपण समाजात शांतता, सौहार्द आणि न्याय प्रस्थापित करू शकतो. त्यांच्या धम्माच्या मार्गावर चालल्यास मानवजातीसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवणे शक्य आहे.अशा या महान सम्राटाला त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे स्मरण ठेवणे आणि त्यांची अंमलबजावणी आपल्या जीवनात करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण एक सुसंस्कृत, समतामूलक आणि शांततापूर्ण समाज निर्माण करण्याचा संकल्प करूया.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# चिमण्यांनो परत फिरा! पाचोडच्या शिवछत्रपती महाविद्यालयात भरली 'पाखरांची शाळा'

**आत्ताच एक्सप्रेस**

**पाचोड (प्रतिनिधी)** एकिककडे आधुनिकतेच्या नावाखाली उभ्या राहिलेल्या मोबाईल टॉवर्सच्या विळख्यात चिमण्यांचे अस्तित्व धोक्यात आले असताना, पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयाने मात्र मानवतेचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. चिमण्यांनो परत फिरा रे... अशी साद घालत महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिक्षकांनी पक्षिसंवर्धनासाठी कंबर कसली असून, आज महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांसोबतच पक्ष्यांचीही शाळा भरत असल्याचे सुखद चित्र पाहायला मिळत आहे.

टॉवर्सच्या रेडिएशनला माणुसकीचे उत्तर

आजच्या धावपळीच्या युगात मोबाईल क्रांतीमुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने घटत आहे. या चिऊताईला वाचवण्यासाठी केवळ 'जागतिक चिमणी दिन' साजरा करून न थांबता, प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला आहे. महाविद्यालयाच्या मैदानातील झाडांच्या फांद्यांना मातीची मडकी बांधून



### चिमणी वाचवाः समाजासाठी साद

**अस्तित्व धोक्यातः** सिमेंटची जंगले आणि मोबाईल टॉवर्समुळे चिमणी आज दुर्मिळ होत आहे.

**अन्नसाखळीः** कीटक आणि धान्य खाऊन निसर्गाचे चक्र टिकवण्यात चिमणीचा मोठा वाटा आहे.

**आपले कर्तव्यः** प्रत्येकाने आपल्या घराच्या बाल्कनीत किंवा अंगणात मातीच्या भांड्यात पाणी आणि मूठभर धान्य ठेवल्यास या चिऊताईला आपण पुन्हा आपल्या अंगणात आणू शकतो.

त्यात दररोज नित्यनियमाने बाजरी, ज्वारी, तांदूळ आणि पाण्याची व्यवस्था केली जात आहे.

**पाच वर्षांच्या मेहनतीतून फुलले नंदनवन**

केवळ अन्न-पाणीच नव्हे, तर पक्ष्यांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी गेल्या पाच वर्षांपासून महाविद्यालयाने वृक्षारोपणावर भर दिला. ग्रामपंचायतीच्या मदतीने पाण्याची सोय झाल्याने आज महाविद्यालय परिसर उंच वाढलेल्या हिरव्यागार झाडांनी वेढला गेला आहे. या घनदाट झाडांमुळे आणि ओट्यावर मिळणाऱ्या अन्नामुळे चिमण्यांचे थवेच्या थवे या ठिकाणी विसावत आहेत.

पाणी व चाऱ्यासाठी पक्ष्यांची होणारी कासावीस पाहून आम्ही 'घोटभर पाणी अन् मूठभर धान्य' हा उपक्रम सुरू केला. आज जेव्हा परिसरात चिमण्यांचा चिवचिवाट ऐकू येतो, तेव्हा आमचा 'चिमण्यांनो परत फिरा रे' हा उद्देश सफल झाल्याचे समाधान मिळते.

**- प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे, शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड**

या शिलेदारांनी पेलली जबाबदारी

या उपक्रमात उपप्राचार्य यादव, प्रा. बिडवे, प्रा. कांबळे, प्रा. इंगळे, प्रा. पोटभरे, प्रा. जैन आणि वाघ या शिक्षकांनी मोलाचे योगदान दिले आहे. स्वतःच्या खिशातून पक्ष्यांसाठी अन्नधान्य खरेदी करून हे शिक्षक दररोज पक्ष्यांची भूक भागवत आहेत.

– वृत्तसंकलनः गणेश सपकाळ

# भारत आनंदी का नाही?

**२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग नऊव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११६ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग नऊव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे असले तरीही.**

**फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारतातही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.**

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# अशोक खरात या नराधमाला फाशीची शिक्षा व मदत करणाऱ्या दिग्गजांना कठोर शिक्षा होईल का?

महाराष्ट्राच्या इतिहासातील अशोक खरात या नालायक नराधमाने विकृतीची हद पार करून भयावह कृत्य केले आहे ज्याची कल्पना करणे कठीण आहे आणि ही आता महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स झाली आहे.त्यामुळे ही संपूर्ण चौकशी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून व्हायला पाहिजे. असे वाटते की भोंदूबाबा अशोक खरात त्यांना मदत करणारे राजकीय पुढारी यांनी आतापर्यंत डोळ्यांवर पट्टी का बांधली होती?खरात सोबत दिर्घकाळ चर्चा करणारे राजकीय पुढारी यांना खरातच्या कुकृत्याची खबर कशी काय लागली नाही? त्याच्या जवळ व त्यांच्या सहकाऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आली कोठून?खरातला खतपाणी कोण घालायचे? असे अनेक प्रश्न आज सर्वसामाण्यांच्या मनात भेडसावत आहे.आज आपण मिडियाच्या माध्यमातून पहातो की नालायक अशोक खरात सोबत अनेक दिग्गज नेत्यांचे फोटो आहेत.याचाच अर्थ असा की,या दिग्गज राजकीय पुढाऱ्यांचा अशोक खरात सोबत कुठेतरी काहीतरी अवश्य संबंध असायलाच पाहिजे.रुपाली चाकणकर ह्या महिला आयोगाच्या जबाबदार अध्यक्षा होत्या.महिला आयोगाचे पद महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व अत्याचाराच्या दृष्टीकोनातून निराकरण करण्यासाठी निर्णय देणारे उच्च पद आहे जेणेकरून पिडित महिलांना योग्य न्याय मिळावा व समाजात सर्व काही सुरळीत रहावे.परंतु रूपाली चाकणकर यांनी महिलांना न्याय देण्याचे सोडून अशोक खरात सारख्या भोंदू बाबाच्या नांदी लागुन व त्यांचे पाय धुवून अनेक महिलांचे वाटोळे केले.रूपाली चाकणकरांचे काम झाले की,लोका सांगे ब्रह्मज्ञान व स्वतः कोरडे पाषाण.आपण पहातो की मिडियाच्या माध्यमातून अशोक खरात याचे १०० हुन अधिक अश्लील व्हिडिओ सामोर आले आहेत यावरून आपण समजू शकतो की खरात यांची विकृती किती शिगेला पोहोचली होती आणि खालच्या स्तरावर जावून ठेपली होती आणि अशा नराधमाचे पाय सुरक्षित माजी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर धुतात आणि राजकीय पुढारी त्यांच्या पायापडतात ही कीती शरमेची आणि लाजिरवाणी बाब आहे.मी तर म्हणेल की, ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे घनिष्ठ संबंध होते अशा सर्वांनाच सरकारने सह आरोपी बनवायला पाहिजे .कारण खरातनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला कलंकित केले आहे.त्याचप्रमाणे अशोक खरात सोबत ज्या -ज्या दिग्गज नेत्यांचे फोटो किंवा बैठका झाल्या आहेत त्यांचीही चौकशी होणे गरजेचे आहे.कारण अशोक खरात विकृत होताच परंतु सेक्स रॅकेट चालवायचा का? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.ज्याप्रमाणे एखाद्या गुन्हेगारासोबत सर्वसामान्य व्यक्तीचा फोटो असतो अशा परिस्थितीत पोलीस विभाग सर्वसामान्य व्यक्तीची कसून चौकशी करीत असतो वेळ पडल्यास तुरूंगात सुद्धा टाकतो.

अशाचप्रकारे अशोक खरात सोबत संबंध असणारे व त्यांच्या सोबत फोटोत असणारे या सर्वांचीच कसुन चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण विकृतीची सिमा ओलांडणारा खरात यांच्या जवळ करोडोंची संपत्ती आली कोठून याची चौकशी करण्यासाठी त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी आवश्यक आहे. खरात हा राज्यासह देशाचा मोठा गुन्हेगार आहे, महिलांचा गुन्हेगार आहे,पिडीतांचा गुन्हेगार आहेत, सर्वसामान्यांचा गुन्हेगार आहे आणि अनेकांची संपत्ती हडपण्याचे काम खरात यानी केले आहे त्यामुळे त्याच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे तेंव्हाच सत्य सामोर येईल.कारण खरातच्या या प्रकरणावरून असे लक्षात येते की,यात मोठमोठे मासे अडकु शकतात यालाही नाकारता येत नाही.आपण जेव्हा समान कायदा किंवा समान अधिकार म्हणतो तेव्हा खरातच्या केसमध्ये सर्वांनीच खुलुन सुरक्षा विभाग,पोलीस विभाग यांना सर्वतोपरी सहकार्य करने आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या-ज्या महिलांवर अत्याचार झाले आहेत किंवा खरातनी ब्लॅकमेल करण्याचे प्रयत्न केले आहे अशा सर्वांनी पोलीस यंत्रणेला मदत करून या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला पाहिजे जेणेकरून असे घृणास्पद कृत्य भविष्यात कोणीही करू शकणार नाही.


भोंदू खरातने नरबळी व पशुबळी दिल्याचेही सांगितले जाते त्यामुळे खरात विकृत,नालायक आहेच सोबतच सर्वसामान्यांचा मोठा हत्यारा सुध्दा आहे. त्यामुळे त्याच्या सोबत असणाऱ्यांचा किंवा फोटोंमध्ये असणाऱ्यांची कसून चौकशी व्हायलाच पाहिजे तेव्हाच दुध का दुध पाणी का पाणी होईल. राजकीय पुढारी प्रथम खरातला भेटले तेव्हा चांगले बाबा होते आणि आता भोंदूबाबा म्हणतात याची लाज व शरम खरातला भेटणाऱ्या राजकीय पुढारी व सेलिब्रिटीला वाटायला पाहिजे.यावरून स्पष्ट होते की, राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि अस्तित्वासाठी भोंदूबाबांना सुध्दा जवळ करतात. खरातने शेतकऱ्यांची जमीन लुबाडली धरणाचे पाणी आपल्या शेतात वळवते केले तेव्हा राजकीय पुढारी खरातच्या पायाशी लोळत होते आणि आता भोंदूबाबा म्हणून पळ काढण्याचा प्रयत्न राजकीय पुढारी करीत आहे ही बाब सामान्य माणूस व कायदा कदापि सहन करणार नाही.जोपर्यंत भोंदूबाबा प्रकरणात राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई किंवा चौकशी होत नाही तोपर्यंत समाजाला व सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळणार नाही.

खरातचे आता जेवढे काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत ते फक्त ५० टक्के असावेत यापुढे आणखी मोठा उलघडा होऊ शकतो.कारण खरात राजकीय पुढाऱ्यांच्या मदतीने सेक्स कैन्डलसह अनेक कारनामे करीत असावेत अशीही शंका निर्माण होत आहे,याचाही खुलासा व्हायला हवा. राज्याची सुरक्षा यंत्रणा,पोलीस यंत्रणा व एसआयटी सह स्थानिक पोलिस यंत्रणा अत्यंत शिताफीने कार्य करीत आहेत आणि त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे.अशा परिस्थितीत सरकारने, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, राजकीय पुढारी यांनी सुरक्षा यंत्रणेला सर्वतोपरी सहकार्य केले पाहिजे.ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे खरात सोबत चर्चा करतांनाचे फोटो आहेत त्यांना सुध्दा सह आरोपी बनवून कारवाई केली पाहिजे.खरातला खतपाणी घालण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनीच केले आहे त्यामुळे खरातने आपल्या घृणास्पद कृत्यावर पकठ मजबूत ठेवली होती आणि आज उघडकीस आले तर सर्वच राजकीय पुढारी खरातच्या केसपासुन भोंदूबाबा म्हणून हात झाडण्याचे काम करीत आहेत हे राज्याचे दुर्भाग्य आहे.मी सरकारला विनंती करतो की महाराष्ट्राला खरातच्या कलंकापासुन वाचविण्यासाठी अशोक खरातची फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून संपूर्ण उलघडे करावेत व लवकरात लवकर अशोक खरातच्या गळ्यात फाशीचा दोर पडावा सोबतच खरात सोबत संबंध ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.जय हिंद.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

## संक्षिप्त

### सावळदबारा येथे श्रीरामनवमी उत्साहात साजरी; श्रीराम मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मांदियाळी



**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा (प्रतिनिधी)** मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवाचा सोहळा सावळदबारा (ता. सोयगाव) येथे अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीरामनवमीनिमित्त स्थानिक श्रीराम मंदिरात सकाळपासूनच भाविक भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

चैत्र शुद्ध नवमीच्या मुहूर्तावर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'श्रीराम जय राम जय जय राम'च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी भारतीय जनता पार्टीचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी प्रभू श्रीरामाचे दर्शन घेऊन उपस्थितांना उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.या मंगलप्रसंगी वासुदेव खडके, आबराव कोलते, रमेश खराटे, बाळू खडके, पंढरी सपाटे, विठ्ठल टिकारे, बाळू आप्पा चोपडे, विशाल खडके, शिवाजी शिपल्कर यांसह गावातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.
दुपारी रामजन्मोत्सव सोहळा पार पडल्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. उत्सवाचे नेटके नियोजन आणि भाविकांच्या शिस्तबद्ध दर्शनामुळे सावळदबारा परिसरात भक्तीचे चैतन्य पसरले होते.

### हिवरखेडा (गौंताळा) येथील श्री नित्यानंद धाम संस्थानमध्ये श्रीराम जन्मोत्सवाचा उत्साह

**अखंड रामायण पठण व महाप्रसादाचे आयोजन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी, उदय कुलकर्णी)** तालुक्यातील हिवरखेडा (गौताळा) येथील श्री क्षेत्र नित्यानंद धाम संस्थानमध्ये श्रीराम जन्मोत्सवा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे जय्यत नियोजन करण्यात आले आहे. उत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्याला बुधवार, २५ मार्चपासून अखंड रामायण पाठाच्या वाचनाने प्रारंभ झाला आहे.

या उत्सवांतर्गत गुरुवार, २६ मार्च रोजी सकाळी ८ ते १०:३० या वेळेत 'सुंदरकांड' पठण करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १२:३० या वेळेत मूर्तीचा अभिषेक, विशेष पूजा आणि महाआरती संपन्न होईल. भाविकांसाठी दुपारी १२:३० नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे मध्य प्रदेशातील रतलाम येथील प्रख्यात भजन सम्राट राधेशाम पाटीदार व त्यांचे भजनी मंडळ आपल्या मधुर वाणीतून सुंदरकांड आणि भजनांचे सादरीकरण करणार आहेत.परम पूज्य श्री विश्वानंदजी अवधूत स्वामी यांच्या प्रेरणेतून होणारा हा सोहळा श्री राम मंदिर, श्री क्षेत्र नित्यानंद धाम संस्थान, हिवरखेडा (गौताळा), ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक श्रीराम भक्तगण मंडळ, हिवरखेडा यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन ६ एप्रिल रोजी; जाणून घ्या अर्ज करण्याची प्रक्रिया

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी आयोजित केला जाणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन यावेळेस सोमवार, ६ एप्रिल रोजी पार पडणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १२ वाजता या सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी दिली आहे.

प्रशासकीय नियमांनुसार, दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी हा उपक्रम राबवला जातो. एप्रिल महिन्यातील हा दिवस ६ तारखेला येत असून, नागरिकांनी आपले प्रश्न मांडण्यासाठी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अर्ज दाखल करण्यासाठी महत्त्वाच्या सूचना

लोकशाही दिनाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी खालील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

वेळ आणि ठिकाण: तक्रार अर्ज ६ एप्रिल रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात स्वीकारले जातील. दुपारी १२ वाजता प्रत्यक्ष सुनावणी सुरू होईल.

अर्जाचा नमुना: तक्रार अर्ज विहित नमुन्यात असणे अनिवार्य आहे.

तक्रारीचे स्वरूप: तक्रार ही केवळ वैयक्तिक स्वरूपाची असावी. सामुदायिक किंवा सार्वजनिक प्रश्नांचा यात विचार केला जात नाही.

तालुका स्तरावरील पुरावा: जर संबंधित तक्रार यापूर्वी तालुकास्तरीय लोकशाही दिनात मांडली असेल, तर त्या अर्जाची पोचपावती (Receipt) सोबत जोडणे आवश्यक आहे.

कोणते अर्ज स्वीकारले जाणार नाहीत?

लोकशाही दिनाच्या शिस्तीचे पालन करण्यासाठी काही प्रकरणांना या प्रक्रियेतून वगळण्यात आले आहे:

न्यायप्रविष्ठ प्रकरणे: जी प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.

राजस्व अपील: महसूल विभागाशी संबंधित अपील प्रकरणे.

सेवा/आस्थापना विषयक: सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती किंवा आस्थापना विषयक तक्रारी.

पुनरावृत्ती: लोकशाही दिनात यापूर्वीच दाखल केलेले आणि त्यावर कार्यवाही सुरू असलेले अर्ज पुन्हा स्वीकारले जाणार नाहीत.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी नियमावलीचे पालन करून आपले रास्त प्रश्न प्रशासनासमोर मांडावेत, जेणेकरून तक्रारींचे निवारण जलद गतीने होऊ शकेल.

# मतदार यादीचे मॅपिंग आणि पडताळणी ३० मार्चपर्यंत पूर्ण करा; जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे कडक निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** जिल्ह्यातील मतदार यादी पुनरक्षण कार्यक्रमाला वेग आला असून, ३० मार्च अखेरपर्यंत मतदार यादीचे मॅपिंग आणि पडताळणीचे काम १००% पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

बीएलओ (BLO) मार्फत मतदारांच्या घरी जाऊन ही पडताळणी प्रक्रिया राबवण्यात येत असून, यामध्ये कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित सुपरवायझरच्या दोन सत्रांतील प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड आणि तहसीलदार नीलेश अपार यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुटीच्या दिवशीही काम सुरू राहणार

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार जिल्ह्याचे मॅपिंगचे उद्दिष्ट किमान ९० टक्क्यांपर्यंत ३० मार्चपर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे. हे काम राष्ट्रीय



महत्त्वाचे असल्याने या प्रक्रियेत सहभागी असलेल्या बीएलओ आणि सुपरवायझरना इतर कामांतून कार्यमुक्त करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, शासकीय सुट्ट्यांच्या काळातही हे काम प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

पडताळणीची प्रक्रिया आणि सुपरवायझरची जबाबदारी:

प्रत्यक्ष गृहभेट: बीएलओने प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहितीची खातरजमा करावी.नोंदणी व स्थलांतर: नवीन मतदारांचा समावेश करणे, मयत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि मतदाराच्या संमतीने त्याचे नाव योग्य ठिकाणी निश्चित करणे ही प्रक्रिया पार पाडावी लागेल.२००२ च्या यादीशी पडताळणी: मॅपिंग करताना २००२ सालच्या मतदार यादीतील माहितीशी सध्याच्या माहितीची पडताळणी करणे अनिवार्य आहे. नवमतदार नोंदणी: १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांची माहिती त्यांच्या पालकांकडून घेऊन त्यांचे नाव यादीत समाविष्ट करण्यावर भर दिला जाणार आहे.

नियोजनाची कडक अंमलबजावणी

प्रशासनाने कामाच्या सुलभतेसाठी प्रत्येक १,००० मतदारांमागे एक बीएलओ आणि १० बीएलओच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी एका सुपरवायझरची नियुक्ती केली आहे. सुपरवायझरनी वेळोवेळी या कामकाजाचा आढावा घेऊन ३० मार्चची डेडलाईन पाळण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.या मोहिमेमुळे जिल्ह्यातील मतदार यादी अधिक पारदर्शक आणि त्रुटीमुक्त होणार असून, पात्र मतदारांना मतदानाचा हक्क बजावणे सुलभ होणार आहे.

**जाहीर प्रगटन**

## तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, गंगापूर न्यायालयत

सर्व जनतेला या प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम, २०२३ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर सुनावणी प्रक्रिया सुरू आहे.

**अर्जदारः श्री. लक्ष्मण बोबडे**

पत्ता: रा. बोरगाव, ता.गंगापूर

**विषयःत्यांचा मुलगा हर्ष ईश्वर बोबडे याच्या जन्म नोंदणीबाबत...**

जन्माचा तपशील: हर्ष ईश्वर बोबडे यांचा जन्म दिनांक २०/०४/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, गंगापूर, ता.गंगापूर येथे झाला आहे.अर्जाचे कारण संबंधित रुग्णालयात सदर जन्माची नोंदणी वेळेत न झाल्यामुळे, अर्जदाराने जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अन्वये जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणी कोणाचे काही उजर, आक्षेप किंवा हरकत असल्यास, त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली हरकत मूळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावी.मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही आणि अर्जदाराच्या जन्म प्रमाणपत्राबाबतचे आदेश पारित करण्यात येतील.

**दिनांकः**२३/०३/२०२६

**स्थळः** गंगापूर

**(सही व शिक्यानिशी)**

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, गंगापूर**

**जाहीर प्रगटन**

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, गंगापूर

विषय: जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अन्वये जन्म नोंदणी मिळण्याबाबत.

**अर्जदारः** श्री. सागर बद्रीनाथ उबाळे, रा. वरखेड, ता. गंगापूर.

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, अर्जदार श्री. सागर बद्रीनाथ उबाळे (रा. वरखेड, ता. गंगापूर) यांनी या कार्यालयाकडे एक विनंती अर्ज सादर केला आहे. अर्जातील तपशिलानुसार, त्यांचा मुलगा राजरत्न सागर उबाळे याचा जन्म दिनांक १४/०४/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, गंगापूर येथे झाला आहे.सदर जन्माची नोंद संबंधित ठिकाणी वेळेवर केलेली नसल्यामुळे, अर्जदाराने जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अंतर्गत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश देण्याची विनंती केली आहे.हरकत/आक्षेप नोंदविण्याबाबत:

सदर जन्म नोंदणीबाबत किंवा प्रमाणपत्र जारी करण्याबाबत जर कोणाचे काही उजर, आक्षेप किंवा हरकत असेल, तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली हरकत मूळ कागदपत्रांसह या न्यायालयात (तहसिलदार कार्यालय, गंगापूर) नोंदवावी.मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही आणि अर्जदाराच्या जन्म प्रमाणापत्राबाबत कायदेशीर आदेश पारित करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक: २४/०३/२०२६

स्थळ: गंगापूर

**(सही व शिक्यानिशी)**

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, गंगापूर**

## प्रभू श्रीराम जल्मोत्सवाच्या अध्यक्षपदी ईश्वर पाटील, तर उपाध्यक्षपदी विनोद गजलेश्वर यांची निवड; कन्नडमध्ये भव्य शोभायात्रेचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधीः उदय कुलकर्णी)** कन्नड शहरात २६ मार्च रोजी साजरा होणाऱ्या प्रभू श्रीराम जल्मोत्सवाच्या तयारीला वेग आला असून, या उत्सवाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीत जल्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी स्वराज रक्षक युवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ईश्वर पाटील यांची, तर उपाध्यक्षपदी संघटनेचे धडाडीचे पदाधिकारी विनोद गजलेश्वर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



नुकतीच स्वराज रक्षक युवा संघाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने हा निर्णय घेतला. निवडीनंतर संघटनेच्या वतीने प्रभू श्रीरामाच्या जयघोषात या दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

नवनियुक्त अध्यक्ष ईश्वर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जल्मोत्सवाच्या कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे. कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.प्रतिमा पूजनः सकाळी ठीक १०:०० वाजता शहरातील मुख्य गिरणी मैदान येथे प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करून उत्सवाचा प्रारंभ होईल.

भव्य शोभायात्राः सायंकाळी ५:३० वाजता गिरणी मैदान येथूनच शहरात भव्य शोभायात्रेला सुरुवात होईल. ही शोभायात्रा शहराच्या प्रमुख मार्गावरून मार्गस्थ होणार आहे.या भव्य शोभायात्रेत कन्नड शहर व तालुक्यातील प्रभू श्रीराम भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन जल्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रसंगी अध्यक्ष ईश्वर पाटील, उपाध्यक्ष विनोद गजलेश्वर यांच्यासह संजय पंडित, अनिल खंबाट, अनिल शिरसाठ, रमेश शिंदे, कैलास जाधव, श्रीकृष्ण बडग, राजेंद्र गजलेश्वर, प्रमोद ढोले, दीपक डोळस, उमेश राठोड, निशांत चव्हाण, जयेश देशमुख, ओम गोरे, वैभव देशमुख, शुभम यांसह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यसनमुक्तीचा ध्यास अन् 'नानक साई'चा सन्मान! छत्रपती संभाजीनगरचे सुपुत्र दिलीप जाधव यांचा शिर्डीत गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**

**शिर्डी/विशेष प्रतिनिधी**/समाजाला व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी नि:स्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या दिलीप जाधव यांच्या कार्याची दखल आता राष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. शिर्डी येथे नानक साई फाउंडेशनतर्फे आयोजित विशाल साई भक्त संमेलनात जाधव यांना सातव्या 'नानक साई' पुरस्काराने अत्यंत उत्साहात सन्मानित करण्यात आले.

शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात आणि प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्या शुभहस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी शिर्डी नगरीत मोठा उत्साह दिसून आला. दिलीप जाधव यांनी पोलीस दलात असताना आणि सेवानिवृत्तीनंतरही समाजसेवेचे जे व्रत जोपासले आहे, त्याचे कौतुक या व्यासपीठावर करण्यात आले.

अधिकारी ते समाजसेवक: एक प्रेरणादायी प्रवास

दिलीप जाधव हे केवळ एक अधिकारी नाहीत, तर ते योग आणि अध्यात्माचे खंदे उपासक आहेत. पोलीस माहिती तंत्रज्ञान व दळणवळण विभागातून पोलीस निरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांची समाजसेवेची ऊर्जा तसूभरही कमी झालेली नाही. सध्या ते समृद्धी महामार्गाचे मुख्य सुरक्षा अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडतानाच त्यांनी व्यसनमुक्तीची मोठी चळवळ उभी केली आहे.

जाधव यांची ओळख केवळ पोलीस दलातील तज्ज्ञ म्हणून मर्यादित नाही. ते:पतंजलीचे मुख्य योग शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

रेकी ग्रँडमास्टर आणि प्राणीक हिलर म्हणून अनेकांना आध्यात्मिक व शारीरिक आरोग्य मिळवून देत आहेत.

त्यांच्या याच बहुआयामी कार्याला आणि सामाजिक बांधिलकीला नानक साई फाउंडेशनने सलाम केला आहे.

दिलीप जाधव यांच्या कार्यामुळे समाजात एक सकारात्मक संदेश जात आहे. व्यसनमुक्तीसाठी त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे, म्हणूनच त्यांना या पुरस्काराने सन्मानित करताना आम्हाला अभिमान वाटतो.

– श्री. पंढरीनाथ बोकारे (प्रमुख, नानक साई फाउंडेशन)

यापूर्वीचे मानाचे पुरस्कार

दिलीप जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेबद्दल यापूर्वी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे, ज्यात पोलीस हासंचालक सन्मान चिन्ह विशेष सेवा पदक व आंतरिक सुरक्षा पदक वनश्री आणि ग्रीन आयडॉल पुरस्कार या ताज्या पुरस्कारामुळे दिलीप जाधव यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाजाच्या आरोग्यासाठी आणि व्यसनमुक्त पिढी घडवण्यासाठी झटणाऱ्या एका 'खऱ्या योद्ध्याचा' हा यथोचित गौरव असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## श्रीक्षेत्र वेरूळच्या नाथ आश्रमात रामनवमीचा अभूतपूर्व उत्साह; 'संगीतमय नवनाथ कथे'चे भव्य ध्वजारोहण संपन्न

**खुलताबाद । प्रतिनिधी/** जागतिक वारसा लाभलेल्या वेरूळ नगरीतील श्री नाथ आश्रमात रामनवमीचा उत्सव अत्यंत भक्तीमय आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. प्रभू श्रीरामाच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून, आश्रमात आगामी काळात होणाऱ्या 'संगीतमय नवनाथ कथा' सोहळ्याच्या ध्वजाची प्रतिष्ठापना करण्यात आली. या सोहळ्यामुळे वेरूळ परिसरात आतापासूनच भक्तीचा मळा फुलला आहे.

२ ते ९ एप्रिल दरम्यान रंगणार नवनाथ कथा

आश्रमाच्या मठाधिपती सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या भव्य सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे. २ एप्रिल ते ९ एप्रिल २०२६ या कालावधीत ही संगीतमय नवनाथ कथा संपन्न होणार आहे. या मंगल कार्याची नांदी म्हणून २६ मार्च रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर टाका आश्रमाचे प्रमुख श्री विद्या वामदेवतिर्थ स्वामी यांच्या हस्ते आणि प्रमुख उपस्थितीत कथेच्या ध्वजाचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले.

रामाचा आदर्श आणि संयम हेच जीवनाचे सार – सद्गुरु अक्काताई महाराज

ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना सद्गुरु अक्काताई महाराज यांनी प्रभू श्रीरामाच्या जीवनातील मूल्यांवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या:

प्रत्येक व्यक्तीने प्रभू श्रीरामचंद्रांच्या आदर्शांचे अनुकरण करून जीवन जगले पाहिजे.

आजच्या धावपळीच्या युगात शांतता, संयम आणि मर्यादा यांचे पालन केल्यास मानवी जीवन खऱ्या अर्थाने मंगलमय होते. देव, देश आणि धर्माची सेवा करताना प्रामाणिकपणा व कष्टाची साथ कधीही सोडू नका.

मान्यवरांची उपस्थिती आणि महाप्रसाद

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये प्रामुख्याने:

इंजि. अतुल चव्हाण पाटील (अभियंता)

प्रकाश चव्हाण (भाजप तालुकाध्यक्ष)

प्रकाश पाटील (सरपंच, वेरूळ)

प्रकाश वाकळे यांच्यासह वेरूळ पंचक्रोशीतील शेकडो भाविक या सोहळ्याचे साक्षीदार झाले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.




**भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन**

२ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या 'संगीतमय नवनाथ कथे'त नवनाथांचा महिमा आणि अध्यात्मिक बोध रसाळ वाणीत ऐकण्याची संधी मिळणार आहे. या नऊ दिवसांच्या ज्ञानयज्ञात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नाथ आश्रम प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# खंडाळी जिल्हा परिषद सर्कलमध्ये विजयी झाल्याबद्दल सौ. शितलताई खोमणे यांचा जालना येथे गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ बामुक्टा आणि ए.बी.आर. एस.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथील व्ही.एस.एस. कॉलेजमध्ये शिक्षण संस्था चालकांच्या विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात खंडाळी जिल्हा परिषद सर्कलच्या नवनियुक्त सदस्या तथा दीपशोभा सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. शितलताई प्रदीपभाऊ खोमणे यांचा त्यांच्या दैदिप्यमान विजयाबद्दल आणि शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

हा सत्कार सोहळा भाजपचे विधानसभा प्रमुख तथा नगरसेवक मा. श्री. भास्कर आबा दानवे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजीराव मदन होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिलीप अर्जुने आणि श्री. कपिलभैया आकात उपस्थित होते.

**दिग्गजांचा सत्कार**

भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते सौ. शितलताई खोमणे यांच्यासह इतर मान्यवरांचाही यथोचित गौरव करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने:

डॉ. सुशील सूर्यवंशी (प्रदेशाध्यक्ष, रिपब्लिकन सेना) श्री. रनवीर देशमुख (नगरसेवक, भोकरदन) यांचा समावेश होता.



तसेच, जालना महानगरपालिकेचे शिक्षक प्रा. शांतीलाल बनसोडे सर यांच्या हस्ते दीपशोभा सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. शितलताई खोमणे आणि सचिव श्री. प्रदीपभाऊ संतुकराव खोमणे यांचाही विशेष सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

**कार्यक्रमाचे स्वरूप**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप अर्जुने सर यांनी मांडले. त्यांनी या सत्कार सोहळ्यामागील भूमिका स्पष्ट करताना शिक्षण संस्था चालकांच्या योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले.

या सोहळ्याला शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. खंडाळी सर्कलच्या विकासासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी सौ. शितलताई खोमणे सातत्याने कार्यरत राहतील, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता सा. बां. विद्युत विभाग छत्रपती संभाजी नगर**

**ई- निविदा सुचना क्र. ३७ सन - २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, औरंगाबाद सा. बां. विद्युत विभाग, ब-१ टक्केवारीच्या ई - प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येत आहेत. को-या निविदा नमुना http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २७.०३.२०२६ वेळ १०.०० ते दि ०३.०४.२०२६ वेळ १७.३० पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्याकरीता उपलब्ध होतील.

टिप :- सदर निविदा सुचनेमध्ये ०१ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
जा.क्र. काअ/छसंविवि/निविदा/ १०२२/सन-२०२६
दि. १३.०३.२०२६.

**(सही/-)**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विद्युत विभाग छत्रपती संभाजी नगर**

# जालन्यात रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रा; 'जय श्रीराम'च्या जयघोषाने अवघी नगरी दुमदुमली

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ प्रभू श्रीरामचंद्र जन्मोत्सवानिमित्त आज जालना शहरात कमालीचा उत्साह पाहायला मिळाला. रामनवमीच्या औचित्याने स्थानिक संभाजी उद्यान येथून एका भव्य रॅलीचे (शोभायात्रा) आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये हजारो रामभक्तांनी सहभागी होऊन शिस्तबद्ध पद्धतीने जल्लोष साजरा केला.



**असा होता रॅलीचा मार्ग:**

संभाजी उद्यान येथून निघालेली ही शोभायात्रा शहरातील मुख्य भागांतून मार्गस्थ झाली. यामध्ये कचेरी रोड, प्रसिद्ध शनी मंदिर, गांधी चमन, मोठी बिल्डिंग आणि पाणीवेस या भागांचा समावेश होता. ठिकठिकाणी या रॅलीचे स्वागत पुष्पवृष्टीने करण्यात आले. रॅलीचा शेवटचा टप्पा शिवाजी पुतळा चौक मार्गे श्रीराम मंदिर येथे झाला, जिथे रॅलीचे विसर्जन करण्यात आले.

**उत्साहाचे वातावरण:**

हातात भगवे ध्वज, कपाळावर टिळा आणि 'जय श्रीराम'चा जयघोष करत तरुणाईसह अबालवृद्धांनी या रॅलीत सहभाग घेतला होता. ढोल-ताशांच्या गजराने वातावरण भक्तिमय झाले होते. शहरातील मुख्य रस्ते भगवेमय झाल्याचे चित्र आज पाहायला मिळाले. ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि प्रसादाची सोय करण्यात आली होती. प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, ज्यामुळे संपूर्ण सोहळा शांततेत पार पडला.

# जालन्यात इंधन टंचाईचा भडका! पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा; अनेक ठिकाणी 'नो स्टॉक'चे फलक

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ जालना शहरासह जिल्ह्यात आज पुन्हा एकदा इंधन टंचाईचे सावट गडद झाल्याचे पाहायला मिळाले. सकाळपासूनच शहरातील प्रमुख पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या प्रचंड रांगा लागल्या असून, अनेक पंपांवरील साठा संपल्याने नागरिकांना रिकाम्या हाती परतावे लागत आहे. प्रशासकीय नियोजनाचा अभाव आणि पुरवठ्यातील विस्कळीतपणामुळे सर्वसामान्यांचे हाल होत असल्याचे चित्र समोर आले आहे.





**पेट्रोल संपले, डिझेलसाठी अवजड वाहनांचा वेढा**

जालन्यातील अनेक पेट्रोल पंपांवर 'पेट्रोल संपले आहे' असे फलक लावण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी पेट्रोल उपलब्ध आहे, तिथे दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या किलोमीटरभर लांब रांगा लागल्या आहेत. विशेष म्हणजे, ज्या पंपांवर पेट्रोलचा साठा संपला आहे, तिथे डिझेलसाठी ट्रक, ट्रॅक्टर आणि बुलडोझर यांसारख्या अवजड वाहनांची मोठी गर्दी दिसून येत आहे. शेतीची कामे आणि बांधकाम व्यवसायातील वाहनांना डिझेल मिळत नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे.

**नागरिकांची वणवण आणि संताप**

एका पंपावर पेट्रोल न मिळाल्यास नागरिक दुसऱ्या पंपाकडे धाव घेत आहेत, मात्र तिथेही तीच परिस्थिती असल्याने वाहनधारकांमध्ये संतापाची लाट आहे. भर उन्हात तासनतास रांगेत उभे राहूनही इंधन मिळेल की नाही, याची शाश्वती नसल्याने नागरिक प्रशासनाकडे जाब विचारत आहेत.

इंधन टंचाईमुळे जीवनावश्यक सेवांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, जर वेळीच पुरवठा सुरळीत झाला नाही, तर जनतेचा हा संताप आंदोलनाच्या स्वरूपात रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.

**प्रशासनाचे मौन की दुर्लक्ष?**

जिल्ह्यात वारंवार उद्भवणाऱ्या या इंधन टंचाईवर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. साठेबाजी होत आहे की पुरवठ्यात अडथळा आहे, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती पुढे आलेली नाही. परंतु, या परिस्थितीमुळे मात्र सामान्य जनतेला आणि व्यवसायिकांना नाहक मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

# जालना जिल्हा परिषदेचा गौरव: वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक रवींद्र पाईकराव जिल्ह्यात प्रथम

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून जालना जिल्हा परिषदेच्या वतीने आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये जिल्हयातून उत्कृष्ट आरोग्य सेवा देण्याबद्दल वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक (डढड) रवींद्र पाईकराव यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून, त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव**

जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) पी. एम. मिनू यांच्या हस्ते रवींद्र पाईकराव यांना 'प्रशस्तीपत्र' आणि 'स्मृतिचिन्ह' देऊन गौरविण्यात आले. क्षयरोग निर्मूलनाच्या कार्यात त्यांनी दाखवलेली तत्परता, रुग्णांचा पाठपुरावा आणि प्रभावी उपचार पद्धतीची अंमलबजावणी यामुळे त्यांची जिल्हयातून प्रथम क्रमांकासाठी निवड करण्यात आली.

**आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती**

या सोहळ्याला आरोग्य विभागातील दिग्गजांची उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने: डॉ. जयश्री भुसारे (जिल्हा आरोग्य अधिकारी)

डॉ. राजेंद्र गाडेकर (जिल्हा शल्य चिकित्सक)

डॉ. मस्के व डॉ. पवार (अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी)



डॉ. जी. एम. कुंडलीकर (जिल्हा क्षयरोग अधिकारी)

या मान्यवरांनी पाईकराव यांच्या कार्याचे कौतुक करून इतर कर्मचाऱ्यांनीही अशाच जिद्दीने काम करण्याचे आवाहन केले.

**तालुका स्तरावरील चोख नियोजन**

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रघुवीर चंदेल, डॉ. नागदरवाड, आणि डॉ. काकड यांच्यासह आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रवींद्र पाईकराव यांच्या या यशामुळे आरोग्य वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील बोकन, पौर्णिमा सोनवणे आणि तालुक्यातील समस्त कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून संपूर्ण टिमचा आहे. क्षयरोगमुक्त भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही अधिक जोमाने काम करू.

**- रवींद्र पाईकराव, वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक**

# रुग्णांच्या जीवाशी खेळ थांबवा! अंबड-जालना मार्गावरील 'शेवगा पाटी'वर आता प्रत्येक एसटी बस थांबणार; विभाग नियंत्रकांचे कडक आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ अंबड ते जालना या मार्गावरील शेवगा पाटी येथे बस थांबत नसल्याने रुग्णांची होणारी परवड आता थांबणार आहे. या गंभीर प्रश्नाची दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जालना विभाग नियंत्रकांनी संबंधित आगार व्यवस्थापकांना कडक निर्देश दिले असून, शेवगा पाटी येथे सर्व प्रकारच्या बसेसना 'विंनती थांबा' देण्याचे आदेश लागू केले आहेत.

**काय आहे नेमकं प्रकरण?**

अंबड-जालना मार्गावर धनगर पिंपरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. या केंद्रांतर्गत पारनेर, लालवाडी, शेवगा, हरतखेडा, मठपिंपळगाव अशा तब्बल २९ ग्रामपंचायती जोडलेल्या आहेत. या भागातील हजारो नागरिक उपचारासाठी याच केंद्रावर अवलंबून आहेत. मात्र, अंबड आगाराच्या अनेक बसेस 'शेवगा पाटी' या महत्त्वाच्या ठिकाणी थांबत नसल्याने रुग्णांचे अतोनात हाल होत होते.

**रुग्णांच्या जीवाला होता धोका**

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अनेकदा सर्पदंश, विंचूदंश आणि कुत्रा चावलेले गंभीर रुग्ण तातडीच्या उपचारासाठी येत असतात. अशा रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळणे आवश्यक असते. मात्र, बस थांबत नसल्याने अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास अडथळे येत होते. ही बाब धनगर पिंपरी येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पत्राद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती.

**प्रशासनाचा 'फुलस्टॉप' आणि कडक इशारा**

रुग्णांच्या तक्रारींची दखल घेत जालना विभाग नियंत्रकांनी आता स्पष्ट केले आहे की:



अंबड ते जालना मार्गावरील सर्व बसेसना शेवगा पाटी येथे प्रवाशांच्या विनंतीनुसार थांबा देणे अनिवार्य असेल.

या थांब्याचा समावेश एढख-च-ठड प्रणालीमध्ये करण्यात आला आहे.

सर्व चालक आणि वाहकांना या निर्णयाची कडक अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जर यापुढे कोणत्याही चालकाने किंवा वाहकाने येथे बस थांबवण्यास नकार दिला आणि प्रवाशांची तक्रार आली, तर संबंधित कर्मचाऱ्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

या निर्णयामुळे परिसरातील २९ गावांमधील नागरिक आणि विशेषतः रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून, आरोग्य सेवा वेळेवर मिळण्यास मदत होणार आहे.

# भक्तीचा महाकुंभ! भगवान नगर (आष्टी) येथे रंगणार 'अखंड हरिनाम सप्ताह' आणि 'श्रीमद् भागवत कथा' सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**
**परतूर प्रतिनिधी**/जालना/ जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील भगवान नगर (आष्टी) येथे येत्या २ एप्रिलपासून अध्यात्माचा अभूतपूर्व जागर होणार आहे. श्री संत भगवान बाबांच्या कृपा आशीर्वादाने आयोजित या 'अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्या'चे हे तिसरे वर्ष असून, यंदाही या सोहळ्याचे स्वरूप अत्यंत भव्य आणि दिव्य असणार आहे. २ एप्रिल ते ९ एप्रिल २०२६ या कालावधीत भक्तीचा हा महाकुंभ लोटणार असून, पंचक्रोशीतील भाविकांमध्ये आतापासूनच मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

**आठ दिवस अखंड भक्तीचा पाऊस!**

या सोहळ्याचे मार्गदर्शन ह.भ.प. अप्पा महाराज चोरे (चाँडी संस्थान) हे करणार असून, श्रीमद् भागवत कथेचे रसाळ निरूपण ह.भ.प. कृष्णा म. वडे (चाँडी संस्थान) हे करणार आहेत. सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी पहाटे ४ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यामध्ये काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत पुराण आणि रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने रंगणार आहेत.

**दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी:**

कार्यक्रमाच्या सविस्तर नियोजनानुसार, दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत राज्यातील नामवंत कीर्तनकारांची सुश्राव्य कीर्तने पार पडणार आहेत:

०२ एप्रिल: ह.भ.प. नाना म. पुरुषोत्तमपुरीकर

०३ एप्रिल: ह.भ.प. रामायणाचार्य विश्वंभर म. माळोदे, ०४ एप्रिल: ह.भ.प. आचार्य रामदास महाराज शास्त्री, ०५ एप्रिल: ह.भ.प. प्रदिप महाराज कायंदे, ०६ एप्रिल: ह.भ.प. माऊली महाराज पुंगळकर, ०७ एप्रिल: श्री ष.ब्र. १०८ विश्वचैतन्य शिवाचार्य महाराज, ०८ एप्रिल: ह.भ.प. प्रल्हाद महाराज ढाकणे, ०९ एप्रिल: काल्याचे कीर्तन - ह.भ.प. महंत आप्पासाहेब म. चोरे (सदगुरु चंद्रशेखर बावा संस्थान, चाँडी)

**महाप्रसादाने होणार सांगता**

गुरुवार, दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन होईल आणि दुपारी २ ते ५ या वेळेत भव्य महाप्रसादाचे वाटप केले जाईल. या सोहळ्यासाठी श्री संत भगवान बाबा तरुण मित्र मंडळ आणि भगवान नगर (आष्टी) येथील समस्त ग्रामस्थ अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

या धार्मिक उत्सवात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन श्रवण भक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापक आणि आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**स्थळ: श्री संत भगवान बाबा नगर, आष्टी, ता. परतूर, जि. जालना. संपर्क: ८७६६८८७०६१, ८८०६३२१५३७**

# भगवान नगर आष्टी येथे 'अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा' सोहळ्याचा भव्य श्रीगणेशा

भक्तीचा महाकुंभ!

**आत्ताच एक्सप्रेस**
**आष्टी (प्रतिनिधी-अंगद मुंढे)** भक्ती, शक्ती आणि परमार्थाची त्रिवेणी संगम असलेल्या जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील भगवान नगर (आष्टी) नगरीत हरिनामाचा गजर घुमणार आहे. श्री संत भगवान बाबांच्या असीम कृपेने याही वर्षी ३ रे वर्ष पूर्ण करत 'अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ व ज्ञानेश्वरी पारायण' सोहळ्याचे अतिशय भव्य नियोजन करण्यात आले आहे. २ एप्रिल ते ९ एप्रिल २०२६या कालावधीत होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला आहे.

**दैनंदिन कार्यक्रमांची रेलचेल**

या सोहळ्यामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, ९ ते १० गाथा भजन, दुपारी १ ते ४ या वेळेत श्रीमद् भागवत पुराण कथा आणि सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ होईल. रात्री ९ ते ११ या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने आणि त्यानंतर रात्रभर हरिजागर होणार आहे.

**कथा प्रवक्ते आणि मार्गदर्शक**

या ज्ञानयज्ञाचे मार्गदर्शक ह.भ.प. आप्पा महाराज चोरे (चौंडी संस्थान) असून, श्रीमद् भागवत कथेचे निरूपण ह.भ.प. कृष्णा म. वडे (चौंडी संस्थान) हे आपल्या ओघवत्या शैलीत करणार आहेत.

## दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी

या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आपल्या वाणीने प्रबोधन करणार आहेत:

-गुरुवार, २ एप्रिल: श्री. ह.भ.प. नाना म. पुरुषोत्तमपुरीकर
-शुक्रवार, ३ एप्रिल: श्री. ह.भ.प. रामायणाचार्य विश्वंभर म. माळोदे
-शनिवार, ४ एप्रिल: श्री. ह.भ.प. आचार्य रामदास महाराज शास्त्री
-रविवार, ५ एप्रिल: श्री. ह.भ.प. प्रदिप महाराज कायंदे
-सोमवार, ६ एप्रिल: श्री. ह.भ.प. माऊली महाराज पुंगळकर
-मंगळवार, ७ एप्रिल: श्री. ष.ब्र. १०८ विश्वचैतन्य शिवाचार्य महाराज
-बुधवार, ८ एप्रिल: श्री. ह.भ.प. प्रल्हाद महाराज ढाकणे
-गुरुवार, ९ एप्रिल: सोहळ्याची सांगता श्री. ह.भ.प. महंत आप्पासाहेब म. चोरे (सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान चौंडी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर दुपारी २ ते ५ या वेळेत महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी श्री संत भगवान बाबा तरुण मित्र मंडळ आणि समस्त गावककरी मंडळी, भगवान नगर आष्टी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. या आध्यात्मिक सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिसागरात सहभागी व्हावे, असे आवाहन व्यवस्थापक समितीने केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813